# B.A. Part–II (Semester–III) Examination
## (Modern Indian Language)
## MARATHI (Compulsory)

वेळ : 3 तास] [एकूण गूण : 80

**सूचना :—**बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करताना गृहीत धरल्या जातील.

1. 'शुद्ध चारित्र्याचा प्रज्ञावंत राजकारणी' या पाठाच्या आधारे यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कर्तृत्वावर प्रकाश टाका. 16

**किंवा**

श्री.म. माटे यांनी भाषेला समृद्ध करण्याची कोणती उपाययोजना 'भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टि' या पाठातून सांगितली आहे ? ते सोदाहरण विशद करा. 16

2. 'आज्ञापत्र' मधून छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरणविषयक दूरदृष्टी कशी अधोरेखित झाली आहे, त्यावर प्रकाश टाका. 16

**किंवा**

'माझे दत्तक वडील' या पाठात आण्णा फाटक यानी लेखकाला कसे फसविले, ते सविस्तर लिहा. 16

3. (अ) संत सोयराबाईंनी आपल्या अभंगातून कर्मठ लोकांवर केलेला प्रहार उलगडून दाखवा.

**किंवा**

बंदिस्तपणाची खंत 'पाखरे' या कवितेतून कशी अधोरेखित झाली आहे, ते सोदाहरण लिहा. 8

(ब) 'दिवसेंदिवस समाजजीवनातील शांतता भंग पावत आहे', हे 'शांतता' या कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

**किंवा**

'जातं' या कवितेचा आशय तुमच्या शब्दांत लिहा. 8

4. (अ) उत्तम वक्ता होण्यासाठी वक्त्याला कोणती पूर्वतयारी करावी लागते, ते लिहा.

**किंवा**

प्रभावी वक्तृत्व कलेचे महत्व सांगून वक्तृत्व कलेतील अडथळे स्पष्ट करा. 8

(ब) सूत्रसंचालन म्हणजे काय ते सांगून सूत्रसंचालन करणाऱ्याकडे कोणकोणते गुण आवश्यक असतात, ते स्पष्ट करा.

**किंवा**

'सूत्रसंचालकाला ताज्या घडामोडींची जाण असव्याबरोबरच, त्याचे भाषेवरही प्रभुत्व असावे लागते' ते कसे, ते स्पष्ट करा. 8

5. खालील बहुपर्यायी प्रश्न सोडवा :

(1) द्विभाषिक मुंबई राज्य कधी निर्माण झाले ?

(अ) 1 मे 1960 (ब) 1 नोव्हें 1956

(क) 1 नोव्हे. 1955 (ड) 1 एप्रिल 1946 1

(2) भारत सरकारने भाषावर प्रांतरचनेकरिता ________ आयोग निर्माण केला.

(अ) भाषावर प्रांतरचना (ब) फाजल अली

(क) द्विभाषिक (ड) नेमस्त 1

(3) 'मी पण स्वत्वाच्या सीमेत दरवळतं, तोपर्यंतच ते सुगंधी असतं !' हा लेख डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या कोणत्या पुस्तकातून घेतला आहे ?

(अ) आस्तिक शिरोमणी चार्वाक (ब) हिंदू संस्कृती आणि स्त्री

(क) मन निरभ्र व्हावं (ड) तुझ्यासह आणि तुझ्याविना 1

(4) अहंकारामुळे ज्ञान ______ बनतं.

(अ) स्वच्छ (ब) गढूल

(क) निर्दोष (ड) संस्मरणीय 1

(5) 'हडकणे' या शब्दातील मूळचे रूपक कोणते आहे ?

(अ) वाळणे (ब) हटकणे

(क) घाबरगुंडी उडणे (ड) हाडकणे 1

(6) 'धावे दणाणणे' या रूपकात्म शब्दाचा व्यावहारिक अर्थ कोणता ?

(अ) धाब्याचा आवाज होणे (ब) घाबरगुंडी उडणे

(क) धाबे वाजणे (ड) धाबे हालणे 1

(7) आण्णा फाटक यांच्या पत्नीला खालीलपैकी कोणत्या नावाने संबोधल्या जात असे ?

(अ) आई (ब) माई

(क) ताई (ड) आजी 1

(8) 'दिवस असे होते' हा उतारा दया पवार यांच्या कोणत्या पुस्तकातून घेतला आहे ?

(अ) कोंडवाडा (ब) धम्मपद्

(क) जागल्या (ड) बलुतं 1

(9) 'आज्ञापत्र' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(अ) छत्रपती शिवाजी महाराज (ब) छत्रपती दूसरे संभाजी महाराज

(क) छत्रपती राजाराम महाराज (ड) रामचंद्रपंत अमात्य 1

(10) 'येकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल'. असे करणाऱ्या धण्याचेच पदरी ________ दोष पडतो.

(अ) बलात्काराचा (ब) अत्याचाराचा

(क) अन्यायाचा (ड) प्रज्यापीडणाचा 1

(11) आण्णा फाटक यांचे जेवन कमी होण्यासाठी लेखकाने त्यांना कोणते पुस्तक वाचावयास दिले ?

(अ) उल्लंघनमींमासा (ब) भोजनमींमासा

(क) लंघणमींमासा (ड) भोजन किती करावे 1

(12) ऊस डोंगा परी ________ नव्हे डोंगा।
काय भुललासि वरलिया रंगा।

(अ) तीर (ब) रस

(क) भाव (ड) जळ 1

(13) "माझ्या पाठीशी मात्र
फक्त सरकारी कचेऱ्यातील भिंती !" असे कोण म्हणाले ?

(अ) छत्रपती शिवाजी महाराज (ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(क) लोकमान्य टिळक (ड) महात्मा गांधी 1

(14) 'जातं' की कविता कोणाची आहे ?

(अ) श्रीकांत देशमुख (ब) सिद्धार्थ भगत

(क) लक्ष्मण महाडिक (ड) कुसुमाग्रज 1

(15) बापाच्या मयतीनंतर
त्याच्या मृत्यूची सरकारी दप्तरी नोंद करताना
तलाठ्याला धावी लागते ______

(अ) सातबारा (ब) सहा 'ड'

(क) मृत्यूचा दाखला (ड) दक्षिणा 1

(16) का भंग होते सारखी ________ शांतता ?
संपादिली होती किती मी संयमाने शांतता !

(अ) आक्रोशाने (ब) दारा-घराने

(क) कोलाहलाने (ड) जागेपणाने 1

139